18-19 (19)


Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019 Special Issue- 112


# महात्मा फुले : व्यक्तित्व, विचार आणि साहित्य






मार्गदर्शक :

डॉ. ज्योत्स्ना सोनखासकर

प्राचार्य,

मराठा विद्या प्रसारक समाजाचे

कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालय,

सिडको, नाशिक.

कार्यकारी संपादक :

डॉ. शंकर बोऱ्हाडे व डॉ. राहुल पाटील

मराठी विभाग,

मराठा विद्या प्रसारक समाजाचे

कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालय,

सिडको, नाशिक.

मुख्य संपादक :

डॉ. धनराज धनगर (येवला)



This Journal is indexed in :

- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक / लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | महात्मा फुले : सत्यशोधक समाज आणि तत्त्वज्ञान | डॉ.संतोष तागड | 05 |
| 2 | महात्मा फुले यांचे साहित्य : विचार आणि लेखन | डॉ. सविता खोकले | 08 |
| 3 | महात्मा फुले यांचे साहित्य व समाजजीवन | डॉ. द. के. गंधारे | 11 |
| 4 | म.फुले, डॉ.आंबेडकरी आणि सत्यशोधकी जलसा व साहित्य संमेलने अहवाल आणि इतिवृत्त | डॉ. मधुकर मोकाशी | 15 |
| 5 | महात्मा फुले : एक साहित्यिक | प्रा. चिंतामण धिंदळे | 21 |
| 6 | महात्मा फुलेंचा सामाजिक दृष्टीकोन | डॉ. विठ्ठल केदारी | 26 |
| 7 | सामाजिक मूल्यांचे साहित्यकार – म.ज्योतीराव फुले | प्रा. वासुदेव डोंगरदिवे | 29 |
| 8 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे साहित्यलेखन | डॉ. समिंदर घोक्षे | 33 |
| 9 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे साहित्यविचार | प्रा. योगिता भामरे | 39 |
| 10 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे सामाजिक विचार आणि समाजातील योगदान | प्रा.संगीता चव्हाणके | 42 |
| 11 | महाराष्ट्रातील सामाजकार्य क्षेत्रात महात्मा फुले यांचे योगदान : एक अभ्यास | प्रा.सुनिता जगताप | 45 |
| 12 | महात्मा फुले यांचे साहित्य विचार : ब्राम्हण्यवाद व आर्थिक विषमता | प्रा. एच. आर. नेटारे व प्रा. यु. बी. देशमुख | 49 |
| 13 | समाजक्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फुले यांचे महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनातील योगदान | प्रा. आदिती कुलकर्णी | 53 |
| 14 | महात्मा फुले यांचा सामाजिक न्यायासाठीचा लढा | प्रा. आर. आर. सोनवणे | 57 |
| 15 | जोतिबा फुले यांचे वाङ्मयदर्शन | प्रा. हर्षला सूर्यवंशी | 61 |
| 16 | महात्मा फुले यांचे साहित्य विचार आणि लेखन | प्रा. कविता मोराडे | 63 |
| 17 | महात्मा फुले यांच्या साहित्यसंपदेचा विविधांगी दृष्टीकोनातून अभ्यास | प्रा. नारायण शिंदे | 66 |
| 18 | महात्मा फुले यांचे साहित्य विचार आणि लेखन | डॉ. मीनाक्षी पाटील | 71 |
| 19 | महात्मा ज्योतीराव फुले यांचे तत्त्वविचार | डॉ. दिलीप पवार | 74 |
| 20 | महात्मा जोतिबा फुले यांचे वाङ्मयीन योगदान | प्रा. नामदेव गावित | 78 |
| 21 | महात्मा फुले यांच्या लेखनावरील संत तुकारामांचा प्रभाव | डॉ. संजय शिंदे | 83 |
| 22 | महात्मा जोतिबा फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्ममधील विचार | डॉ. विजय पाटील | 87 |
| 23 | सार्वजनिक सत्यधर्म | डॉ. राकेश कभे | 90 |
| 24 | सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकाविषयी | प्रा. हिरा वाघ | 94 |
| 25 | शेतकरी व दीन-दुबळयांचे अर्थतज्ञ महात्मा ज्योतीराव फुले | प्रा. आर. के. सूर्यवंशी | 97 |
| 26 | शेतकऱ्यांच्या सामाजिक वास्तवाचे यथार्थ दर्शन 'शेतकऱ्यांचा असूड' | प्रा. विजयश्री गवळी | 101 |
| 27 | महात्मा फुले यांचे शेती व स्त्री शिक्षणविषयक विचार | अक्षय बोंबले | 104 |
| 28 | शेतकऱ्यांच्या वास्तवतेचे चिंतन | प्रा. निलेश आहेर | 109 |
| 29 | 'शेतकऱ्यांचा असूड' | डॉ. प्रतिभा घाग | 112 |
| 30 | 'शेतकऱ्यांचा असूड' मधून प्रकटणारे विचार : एक आकलन | डॉ. राहुल पाटील | 115 |
| 31 | 'शेतकऱ्यांचा असूड' : एक वाङ्मयीन आकलन | डॉ. सुरेश जाधव | 120 |
| 32 | 'शेतकऱ्यांचा असूड' : भाषिक विचार | डॉ. सुरेखा जाधव | 123 |
| 33 | शेतकऱ्यांच्या समस्येबद्दल म. ज्योतीराव फुले यांच्या विचारांचा विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. स्मिता पाकधाने | 127 |
| 34 | पत्रकार फुले आणि त्यांची पत्रपरंपरा | डॉ. शंकर बोऱ्हाडे | 131 |

| | | | |
|---|---|---|---|
| 35 | 'सत्सार' मधील म. फुलेंचे सामाजिक व स्त्री विषयक विचार | प्रा. सारिका गांगुर्डे | 137 |
| 36 | महात्मा फुले यांच्या कवितेतील विद्रोह | डॉ. महादेव कांबळे | 140 |
| 37 | महात्मा फुले यांच्या कवितांची समीक्षा | प्रा. सुनिल लोखंडे | 143 |
| 38 | सामाजिक समतेचे कवी, क्रांतीदूत ज्योतिबा फुले | प्रा. जयश्री बागुल | 147 |
| 39 | 'तृतीय रत्न' मधील संदेश व वर्तमान | डॉ. प्रतिभा जाधव | 150 |
| 40 | महात्मा फुले कृत 'तृतीय रत्न' नाटक | प्रा. दत्तात्रय सावंत | 153 |
| 41 | महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार | डॉ. सुभाष शेकडे | 156 |
| 42 | महात्मा फुले यांची शैक्षणिक दृष्टी आणि दृष्टिकोन | श्रीमती नीलम बागुल | 159 |
| 43 | महात्मा फुले : लोकशिक्षणाचे शिल्पकार | प्रा. विठ्ठल जाधव | 164 |
| 44 | महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार | प्रा. संगीता पाडवी | 168 |
| 45 | मुक्ता साळवे हिच्या निबंधाविषयी | श्रीमती मंजुषा सोनार | 171 |
| 46 | महात्मा जोतीराव फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान | प्रा. लक्ष्मी पवार | 173 |
| 47 | महात्मा फुले यांचे साहित्य विचार आणि लेखन | डॉ. राजेंद्र रासकर | 180 |
| 48 | समतेचा प्रणेता : महात्मा जोतीराव फुले | प्रा. स्वप्नील गरुड | 183 |
| 49 | महात्मा फुले यांच्या विचारधारेचा साहित्यावरील प्रभाव | प्रा. संगीता आहिरे | 186 |
| 50 | महत्मा फुले यांची साहित्य विषयक भूमिका | प्रा. वृषाली उगले | 188 |
| 51 | महात्मा ज्योतिराव फुले और स्त्री स्वतंत्रता: एक परामर्श | डॉ. गीता परमार | 192 |
| 52 | महात्मा फुले यांच्या अखंडांचे विशेष | डॉ. अशोक राणा | 196 |
| 53 | महात्मा फुले यांच्या साहित्याचे मार्केटिंग | डॉ.ए.के.शिंदे | 205 |
| 54 | समाजसुधारक : महात्मा फुले | डॉ. चंद्रकांत रुद्राक्षे | 210 |
| 55 | महात्मा फुले यांचे साहित्य लेखन व सामाजिक योगदान | प्रा. महादेव रोकडे | 213 |
| 56 | 'शेतकऱ्यांच्या असूड'मधून प्रकटणाऱ्या शेतकऱ्यांच्या संवेदना | डॉ. दीपा कुचेकर, प्रा.राजेश झनकर | 217 |
| 57 | महात्मा फुलेंचे कार्य : एक दृष्टिक्षेप | प्रा. दिलीप जाधव | 221 |
| 58 | महात्मा फुले लिखीत सार्वजनिक सत्यधर्म : एक आकलन | डॉ. भाऊसाहेब गमे | 229 |
| 59 | Social Concern in Mahatma Phule's Writing | Ms. Sangita Aher | 234 |
| 60 | Phule as a Crucial Educator : Reading a Nineteenth Century Educating Women and Shudras | Mr. Dnyaneshwar Nikam | 237 |
| 61 | Relevance of Psychology and Social Work of Mahatma Jyotirao Phule | Dr. Shubhangi Gosavi | 241 |
| 62 | The Reflection of Mahatma Jotirao Phule's Literature : A Special Reference to Anti Brahmanism and Untouchability | Mr. Sachin Lokhande | 244 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवले आहेत. प्रकाशक, संपादक यांच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय यातील लेखांचे पूनर्प्रकाशन करता येणार नाही. या विशेषांकातील लेखांतून/संशोधन निबंधांतून व्यक्त झालेली मते ही त्या संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत, त्याच्याशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ स्वामित्व हक्काविषयीची (कॉपी राईट्स संदर्भातील) सर्वस्वी जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.*

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 112: महात्मा फुले : व्यक्तित्त्व, विचार आणि साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# महात्मा ज्योतिराव फुले यांचे तत्त्वविचार

डॉ. दिलीप पी.पवार
विभागप्रमुख, मराठी विभाग
के.टी.एच.एम.महाविद्यालय, गंगापूर रोड, नाशिक
मेल- dppawar9@gmail.com

तारुण्याच्या प्रारंभीच सार्वजनिक जीवनास प्रारंभ करणारे फुले आपल्या लौकिक जीवनाला पाठमोरे होऊन म्हणजेच 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' ही नि:संग वृत्ती स्वीकारून मानवी कल्याणात रममाण झाले. रंजल्या गांजलेल्यांना व दु:खी, अपंगांना त्यांना आधार दिला. स्त्री आणि क्षुद्रांची जन्मजन्मांतरीच्या दास्यांतून सुटका करण्यासाठी धर्म- मार्तंडांच्या पोलादी चौकटीवर जबरदस्त प्रहार केले. १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा काढून स्त्रियांच्या गुलामगिरीवर पहिली कुऱ्हाड हाणली. कोणत्याही गोष्टीचा मूलगामी विचार करण्याची जोतिबांची सवय होती. हिंदू समाजाच्या सामाजिक विस्कळीतपणाची कारणे त्यांनी शोधली आणि आपल्या समाजकार्याला विधायक दिशा दिली. स्त्रिया व अस्पृश्य यांच्या शिक्षणाबरोबरच विधवाविवाह, बालहत्या प्रतिबंधक गृह, केशवपन, द्विभार्याप्रतिबंध चळवळ, मजुरांची आणि शेतकऱ्यांची संघटना, सक्तीचे शिक्षण इ. अनेक गोष्टींत लक्ष घालून या सुधारणा जोतिबांनी समाजास स्वीकारावयास लावल्या. बहुजन समाजाची गीता ठरावे असे वाङ्मयीन ग्रंथ त्यांनी लिहिले. उदा. 'सार्वजनिक सत्यधर्म', 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथातून आधुनिक बुद्धिवाद्याचे दर्शन वाचकाला घडते. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून आपल्या समाजसेवा कार्याला उच्च पातळीवर नेऊन चिरस्वरूप प्राप्त करून दिले.

१८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. तत्पूर्वी जनतेची गाऱ्हाणी त्यांनी इंग्रज सरकारपुढे मांडली. कामगार आणि शेतकरी वर्गाबद्दल त्यांना प्रचंड आस्था होती. राष्ट्रीय सभेची स्थापना होण्यापूर्वी त्यांनी या सभेच्या पुढाऱ्यांना ''शेतकरी व कामगार वर्गाचा समावेश केल्याशिवाय तुमची ही कॉंग्रेस नॅशनल होऊच शकत नाही.''[१] असे स्पष्टपणे बजावले. यावरून देशाच्या मुख्य पक्षामध्ये कामगार वर्गाला उचित व योग्य स्थान मिळाल्याशिवाय त्यांच्यातून पुढे येणाऱ्या नेतृत्वाला संधी मिळणार नाही. शिवाय हा वर्ग मोठ्या प्रमाणात असल्यामुळे राष्ट्रहिताच्या धारेशी निगडीत असलेल्या या पक्षात त्याचा समावेश होणे अत्यंत गरजेचे आहे, असा त्यांचा विचार होता.

ज्योतिराव फुले हे हाडाचे सुधारक होते. सर्व सुधारणांचा पाया शिक्षण असल्यामुळे शिक्षणासाठी म.फुले प्रारंभीपासून कृतिप्रवण झालेले दिसतात. अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा काढून त्यांनी शुद्रांना न्याय देण्यासाठी कृतियुक्त लढा सुरू केला. अस्पृश्यांइतकाच त्यांना कामगारांचा देखील कळवळा होता. आपले नियोजित कामे सांभाळून महात्मा फुले अनेक छोटी छोटी कामे मक्त्याने घेत असत. सार्वजनिक कार्यात पैशाची अडचण नेहमीच भासते या अडचणीमुळे जोतिबांना चरितार्थ चालविणे कठीण जाऊ लागले. त्यामुळे त्यांनी पुन्हा मोठमोठी कामे घ्यावयास सुरुवात केली. खडकवासल्याच्या तलाव बांधकामाला जोतिबांनी दगड पुरविण्याचे कंत्राट घेतले. त्याकाळात त्यांचा मजूर कामगारवर्गाशी जवळून संबंध आला. मजुरांत मिसळल्यामुळे त्यांच्या सामाजिक स्थितीचे त्यांना सजग भान आले. त्यामुळे त्यांनी या वर्गाशी जवळिक प्रस्थापित करून त्यांना शिक्षण, एकजूट व वास्तवाविषयी वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यानंतर येरवडा येथील पूलबांधणी कामासाठी त्यांना चुना पुरविण्याचे कंत्राट मिळाले. तेथील कॉन्ट्रॅक्टर, सरकारी अधिकारी व कारकून लोक मजुरांचे रक्तशोषण कसे करतात. त्यांच्या अज्ञानाचा व श्रमाचा गैरफायदा कसा घेतला जातो, हे त्यांनी जवळून

ISSN : 2348-7143
February-2019

पाहिले आणि मजुरांची बाजू घेऊन इंजिनियरींग खात्याच्या बेशिस्तपणावरही त्यांनी वेळोवेळी हल्ले चढविले. त्यामुळे एकनाथ घोरपडे म्हणतात, ''मजुरांचे गाऱ्हाणे वेशीवर टांगून त्याला वाचा फोडणारा जोतिबा हाच पहिला कम्युनिस्ट म्हणावयाचा.''[2] ह्या शोषणाच्या तऱ्हा अद्यापही सुरूच आहे. आज देखील सरकारी कारभारांमध्ये लाचलुचपत मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळते. प्रत्येक काळात शोषक वर्ग हा शोषित वर्गावर सातत्याने अन्याय करीत आलेला आहे. त्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी जोतिबांनी अनुसरलेली विचारधारा वा स्वीकारलेला मार्ग हा (रशियन क्रांती झालेली नसतानादेखील) मार्क्सवादाच्या जवळ जाणारा आहे. हा शोषक वर्गाविषयीचा कळवळा, त्यांच्यासाठी पुकारलेला लढा यामुळे महात्मा फुले हे पहिले कम्यनिस्ट आहेत, हे घोरपडेंचे विधान पटते.

फुलेपूर्व कालखंडात कामगारांविषयी व त्यांच्या प्रश्नांविषयी कोणीही एवढी आस्था व सहानुभूती दाखवलेली नाही. म्हणूनच महात्मा फुले हे भारतीय कामगार साहित्याचे प्रथम प्रेरणास्थान ठरतात. रशियन क्रांतिकारक आणि महात्मा फुले यांच्या कामगारविषयक कार्याविषयी महर्षी अण्णासाहेब शिंदे म्हणतात, ''जोतिबा रशियन क्रांतिपूर्वीचे सर्वात मोठे कम्युनिस्ट. खेड्यातील कामगार व शेतकरी वर्गाचा त्यांनी सोस घेतला होता. जोतिबांत आणि रशियन क्रांतिकारकांत काही एक फरक असलाच तर तो एवढाच की, एकांत अंध:श्रद्धा होती व दुसऱ्यांत केवळ बाह्यभूक आहे.''[3] या विधानातून कामगार आणि शेतकरी वर्गाशी असलेले नाते स्पष्ट होते. समाजवास्तव सहगतेने टिपणाऱ्या या महात्म्याने प्रारंभीच्या काळात कंत्राटदार म्हणून काम करत असताना अभियंते आणि सरकारी बडे अधिकारी कामगारांची खोटी हजेरी लावून खोटे हिशेब कसे मांडतात. तसेच ब्राह्मण देखील अशा हजेरीसाठी मेस्त्रीला कसे भाग पाडतात व मिळालेला पैसा आपसांत कसे वाटून घेतात हे जवळून पाहिले होते. याशिवाय सरकारी नोकरीवर काम करणारे अनेक अधिकारी स्त्रियांना स्वत:च्या घरी घरकाम करण्यास भाग पाडून नोकर म्हणून राबवित. पगाराच्या दिवशी ओळखीचे ब्राह्मण आणि स्नेही यांना कार्यालयात नेऊन स्वाक्षऱ्या घेऊन न केलेल्या कामाचे वेतन लबाडीने देत. वरिष्ठ अधिकाऱ्यांना या ब्राह्मण कारकुनांच्या प्रामाणिकपणावर विश्वास असल्याने ते पत्रव्यवहारावर सह्या करत. त्यामुळे होणाऱ्या कामकाजात मोठ्या प्रमाणात अपहार होऊन निकृष्ट दर्जाचे काम होत असे, या सर्व गोष्टींचा जोतिबांना अतिशय तिटकारा होता. त्यामुळे त्यांच्या निर्मळ आचरणाविषयी धनंजय कीर म्हणतात, ''जे कामगारांना लुबाडतात, सरकारला थकवतात अन राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कामास आतून स्वार्थाचे भुंगे लावतात, अशा भ्रष्टाचारी जनताद्रोही अधिकाऱ्यांचे जोतीराव प्रत्यक्ष कर्दनकाळच होते.''[4]. जोतिबांचा हा हल्ला हे लोक जातीने ब्राह्मण होते म्हणून नव्हता तर ते लाचलुचपत व गैरव्यवहार करून श्रमिक कामगार वर्गांना भिकेस लावत होते त्यामुळे होता. यासाठी जोतिबा सामाजिक चळवळीची उभारणी करत होते. कनिष्ठ वर्गातील लोकांचे अज्ञान, निरक्षरता, दूषित पूर्वग्रह आणि जातीविषयक भावना ही दूर करून जोतिरावांना बहुजनांना ब्राह्मणांच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त करायचे होते. त्यासाठी जोतिबांनी लेखणी हाती घेऊन आपले क्रांतिकारक विचार ग्रंथ, काव्य व पुस्तिकांच्या रूपाने प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली.

ब्राह्मण मित्राच्या लग्नसमारंभात सनातनी ब्राह्मणांच्या बरोबरीने वावरणाऱ्या जोतिबांना शुद्र संबोधून अपमानित करण्यात आले. ते अपमानकारक शब्द त्यांच्या जिव्हारी झोंबल्यामुळे त्यांच्या मनात अपमानाची सल रुतू लागली. जोतिबांनी छत्रपती शिवाजी महाराज, वॉशिंग्टन आणि मार्टीन ल्यूथर यांच्या जीवनकार्यापासून प्रेरणा घेतलेली होती. मानवी समतेच्या क्रांतिकारक विचारांनी त्यांना अस्वस्थ केले होते. शुद्रांच्या दैन्य आणि गुलामगिरीचे मूळ कशात आहे हे त्यांच्या लक्षात आले. समाजातील भयंकर चालीरीती व रूढी तसेच अन्यायाविरुद्ध झगडा करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. सामाजिक अप्रतिष्ठेचा अनुभव देणारा तो एक कटू

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013) | February-2019
Special Issue 112: महात्मा फुले : व्यक्तित्त्व, विचार आणि साहित्य
UGC Approved Journal

अनुभव जोतिबांच्या पुढील आयुष्यातील चळवळीचा उगमस्थान ठरला. त्यांचे असे ठाम मत झाले की, ''राजकीय गुलामगिरीपेक्षाही सामाजिक गुलामगिरी अधिक वाईट होय.''[५] कारण अशी गुलामगिरी माणसाचे सामाजिक अस्तित्त्वच नाकारते वा त्याची वर्गावर्गांत विषम वाटणी करते. म्हणूनच हिंदूंची समाजव्यवस्था आणि धर्मव्यवस्था यांनी हिंदूंवर मानसिक गुलामगिरी कशी लादली आहे. याबद्दल आपले विचार त्यांनी श्रमजीवी कामगार वर्गामध्ये विशद करून सांगितले.

जोतिरावांचा लढा शुद्रातिशुद्र म्हणजे शेतकरी व भूमीहीन वर्गाच्या उद्धारासाठी होता. त्यांना या वर्गाला सवर्णांच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त करायचे होते. त्यामुळे पुणे शहरात वास्तव्य करून देखील शेतकऱ्यांच्या जीवनाकडे जोतिबांनी डोळेझाक केली नाही. इंग्रजांची शासन व्यवस्था चालवणारा सावकार ते न्यायाधीशांपर्यंतचा सर्व नोकर वर्ग मुख्यत्वे ब्राह्मणच होता. ते संगनमताने कनिष्ठ वर्गाची पिळवणूक करीत होते. जोतिरावांचा लढा धार्मिक आणि सामाजिक समतेसाठी होता. त्यातील गुलामगिरीविरूद्ध होता. म्हणून जोतिबांनी शेतीच्या प्रगतीबाबत शेतकऱ्यांशी चर्चा करून शेती सुधारण्यावर त्यांची मते मागवली. खेडोपाडी जाऊन शेतकऱ्यांचे कृषिविषयक प्रश्न समजून घेतले. त्यांना भ्रामक चालीरिती व धर्मभोळेपणापासून सावध राहणं शिकविलं. कारण 'शेतकरी सुखी तर जग सुखी' या उक्तीवर त्यांचा विश्वास होता. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये शेतकऱ्यांचा प्रतिनिधी असावा यासाठी ते आग्रही होते. राष्ट्रीय पुढाऱ्यांना शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचे समग्र दर्शन त्यांनी घडविले. ते काँग्रेसच्या पुढाऱ्यांना उद्देशून म्हणतात, ''जोपर्यंत तुमच्यात या बहुसंख्य शेतकरी वर्गाचा प्रतिनिधी नाही तोपर्यंत सर्व जनतेचे पुढारीपण करण्यात तुम्ही अपात्र आहात.''[६] राष्ट्रीय काँग्रेसचे हे एक प्रकारचे अपयश आहे. कारण जिथे शेतकऱ्यांचे नेतृत्त्वच नाही तिथे त्यांचे प्रश्न जपणे कळणे असंभव आहे हेच त्यांना सूचित करावयाचे आहे. खोट्या पुढारपणाचा बुरखा जोतिबा टरकावतात तो असा. यामुळे शेतकरी वर्गामध्ये हळूहळू जागृती होऊ लागली. 'शेतकऱ्यांचा असूड' हा ग्रंथ लिहून जोतिबांनी शेतकरी जीवनाचे जे वास्तव मांडले ते या जागृतीसाठी पूरक ठरले. सरकार शेतकऱ्यांकडून लोकल फंड वसूल करते. पण त्याचा मोबदला त्यांना पुरेसा मिळत नाही तर दुसरीकडे वकील, न्यायाधीश देखील शेतकऱ्यांची व्यथा समजून घेत नाही. या संदर्भात म.फुले लिहितात,

*''वकिलाची महागाई। न्यायधिशा दया नाही।*
*पापपुण्य जेथें नाही। पैशापुरतें दादाभाई।*
*नित्य जमती एके ठायी। शुद्राची ती दाद नाही।''*[७]

वकिलाची फी देणे गरिबांना परवडत नाही. हे सगळेच एकाच माळेचे मणी. पैसा हेच यांचे इप्सित असल्याने पापपुण्याच्या पलिकडे गेलेली ही मंडळी आहेत. त्यामुळे भरडले जातात ते केवळ क्षुद्र व शेतकरीच, हेच जोतिबा येथे सूचित करतात.

१९६० सालापासून महाराष्ट्रात अधूनमधून दुष्काळामुळे शेतकरी हवालदिल झाले होते. शेतकरी आणि सावकार यांच्यामध्ये संबंध बिघडले होते. सावकार लोक अज्ञानी शेतकऱ्यांकडून कर्जाऊ दिलेल्या रकमेपेक्षा मोठ्या रकमेचा दस्तऐवज करून घेत. शेतकरी वर्गाला ऋणातून मुक्त करावे. सावकार व शेतकरी यांच्यामधले संबंध सुधारावे. सावकारांनी आपल्या दप्तरांत व खर्चीपत्रात लबाडी करू नये. शेतकऱ्यांच्या हक्काचे आणि हिताचे रक्षण व्हावे म्हणून सरकारने नेमलेल्या चौकशी मंडळाने लादलेले निर्बंध व तरतुदी यांना 'दीनबंधू' साप्ताहिकाने मनःपूर्वक पाठिंबा दिला. या तरतुदींच्या अंमलबजावणी संदर्भात त्यांनी 'दीनबंधू' पत्रातून, ''जर शेतकरी आणि सावकार यांच्यामध्ये देण्याघेण्याचे कमीत कमी संबंध आले, तर शेतकरी स्वावलंबी व उद्योगी होतील आणि आपल्या उत्पन्नावर जगू शकतील; त्यांचा अज्ञानीपणा व अशिक्षितपणा यामुळेच त्यांची अशी

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 112: महात्मा फुले : व्यक्तित्व, विचार आणि साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

अन्नान्नदशा झाली आहे.''[८] असे मत व्यक्त केले. या निर्बंधामुळे शेतकऱ्यांना जमिनीस व मालमत्तेस मुकावे लागणार नव्हते. सावकार आणि ब्राह्मण भिक्षुकांच्या अधाशीपणाला त्यामुळे मर्यादा येणार होत्या.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर भागातील शेतकऱ्यांवर सावकार व जमीनदारांकडून भयंकर जुलूम होत होते. चिडलेल्या शेतकऱ्यांचे नेतृत्व फुले यांनी केल्यामुळे सरकार आणि सावकार हे कुळांचे म्हणणे ऐकून घेण्यास तयार झाले होते. या लढ्यात म. फुले यांनी सन्मान्य तोडगा काढून शेतकऱ्यांचा हा संप यशस्वी करून दाखविला. शोषक आणि शोषित वर्गाच्या लढ्यात शोषकांविरुद्ध शोषितांनी बंड केल्याशिवाय पर्याय नसतो, हेही जोतिबा जाणून असल्यामुळे त्यांनी या संपाबरोबरच तळेगावच्या नापितांचा संप देखील यशस्वी करून दाखविला. शोषितांच्या विकासासंदर्भात जोतिबांची भूमिका मांडताना एकनाथ घोरपडे म्हणतात, ''भांडवलशाही आणि जमीनदारी ही प्रगतीच्या मार्गातील खीळ आहे हे या देशांत कम्युनिझम जन्माला येण्यापूर्वी जोतिबांनी शिकविले''[९] घोरपडे यांच्या या विधानातून भांडवलदार वर्गाकडून होणाऱ्या शोषणाच्या तऱ्हा कोणत्याही देशात थोड्याफार फरकाने एकसमान असतात कारण ते प्रश्न त्या त्या काळात तीव्र रूप धारण करून ऐरणीवर आलेले प्रश्न असतात. फुलेंनी त्याला लवकर वाचा फोडली याउलट मार्क्सला त्याच्या संघर्षकाळात त्या प्रश्नांची जाणीव झाली असे मला वाटते.

**निष्कर्ष:**

- महात्मा फुले यांचे शेती व शेतकरी संदर्भातील विचार साहित्य समकालीन काळातही उपयुक्त व महत्त्वपूर्ण ठरते.
- महात्मा फुले यांच्या व्यक्तित्वावर थॉमस पेन यांच्या मानवी हक्कासंबंधीच्या विचारमूल्यांचा प्रभाव दिसून येतो.
- महात्मा फुले भारतीय कामगार साहित्याचे आद्य प्रणेते आहेत.
- महात्मा फुले यांचा संपूर्ण वैचारिक व कृतिशील लढा हा विविधांगी मानवशोषणा विरोधी व मानवमुक्तीचा पुरस्कार करणारा आहे.


**संदर्भ ग्रंथ**

१. घोरपडे,एकनाथ केशव, महात्मा फुले : चरित्र व कार्य, श्री लेखन वाचन भांडार, पुणे, द्वितीयावृत्ती १९५९, पृ.६
२. तत्रैव , पृ.३६
३. तत्रैव, पृ.३६
४. कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले : आमच्या समाज क्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, चौ.आ. १९९२, पृ. १०५
५. तत्रैव, पृ.२२
६. घोरपडे, एकनाथ केशव, महात्मा फुले : चरित्र व कार्य, श्री लेखन वाचन भांडार, पुणे, द्वितीयावृत्ती १९५९, पृ. ३७.
७. तत्रैव, पृ. ३७
८. कीर धनंजय, उनि, पृ. १७४.
९. घोरपडे एकनाथ केशव, उनि, पृ. ६८.

COSMOS IMPACT FACTOR

Search

HOME | INDEXED JOURNAL | SUGGEST JOURNAL | REQUEST IF | DOWNLOAD LOGO | REVIEWER PANEL



- INDEXED JOURNAL
- SUGGEST JOURNAL
- JOURNAL IF
- REQUEST FOR IF
- DOWNLOAD LOGO
- CONTACT US

SAMPLE CERTIFICATE

SAMPLE EVALUATION SHEET


## Journal Detail

| | |
|---|---|
| Journal Name | RESEARCH JOURNEY |
| ISSN/EISSN | 2348-7143 |
| Country | IN |
| Frequency | Quarterly |
| Journal Discipline | General Science |
| Year of First Publication | 2014 |
| Web Site | www.researchjourney.net |
| Editor | Prof. Dhanraj Dhangar & Prof. Gajanan Wankhede |
| Indexed | Yes |
| Email | researchjourney2014@gmail.com |
| Phone No. | +91 7709752380 |
| Cosmos Impact Factor | 2015 : 3.452 |

GIF GLOBAL IMPACT FACTOR

Institute for Information Resources

News Updates Now Annual membership fee is of just 40 Dollars for existing members and they can renew their membership for year 2016



Get Involved

Recently Added Journals

| Research Journey | |
|---|---|
| ISSN | 2348-7143 |
| Country | India |
| Frequency | Quarterly |
| Year publication | 2014-2015 |
| Website | [illegible] |
| Global Impact and Quality Factor | |
| 2014 | [illegible] |
| 2015 | 0.676 |

TOGETHER WE REACH THE GOAL



SJIF Evaluation on Request

SJIF Publishers Panel

Register journal (Free Service)

Manage journal (Free Service)

Research Journey

SJIF 2016:

Under evaluation

Previous evaluation SJIF

The journal is indexed in:

Basic information

SWATIDHAN PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

Price : Rs. 800/-